## शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी.आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक अभय जायभाये आदी उपस्थित होते.

# विद्यापीठात मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे आयोजन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

- **कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन**
- **प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती**
- **अनेक दिग्गज लेखकांचे मार्गदर्शन**

शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यासाठी अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. त्यातील सातत्य कायम राखून नव्या–जुन्या लेखक प्रकाशकांचे विचार श्रोत्यांसमोर उलगडले जातील. त्यांच्या अभिव्यक्तीच्या प्रेरणा, जाणीवा यांची माहिती होईल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा–२०२१"चे उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त लेखक–संवाद उपक्रमांतर्गत अनेक लेखकांचे विचार कळतील. यामध्ये डॉ. राजन गवस, प्रकाशक अनिल मेहता, महादेव मोरे, मोहन पाटील, माया नारकर, कृष्णात खोत, किरण गुरव, नामदेव माळी, संपत मोरे यांच्याशी संवाद साधण्यात येणार आहे. कुलगुरू डॉ. शिर्के व प्र–कुलगुरू डॉ. पाटील यांनीही उपक्रमाचे कौतुक केले. चित्रकार सुधीर गुरव यांनी ही चित्रे रेखाटली आहेत. प्रास्ताविक मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अक्षय सरवदे, डॉ. अवनिश पाटील, डॉ. मेघा पानसरे, प्राचार्य डॉ. गोविंद काजरेकर, उदयसिंह राजेयादव आदी उपस्थित होते.

## पंधरवड्यांतर्गत आयोजित कार्यक्रम

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यांतर्गत १४ ते २८ जानेवारीपर्यंत 'लेखकसंवाद". १८ जानेवारी विष्णू पावले लिखित 'पधारो म्हारी देस" डॉ. सयाजी गायकवाड यांच्या 'मराठी पोवाडा (तीन भाग)" या ग्रंथांचे डॉ. बी.एम. हिर्डेकर यांच्या हस्ते व कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या उपस्थितीत प्रकाशन. २० जानेवारी 'स्मरण अरुण कोल्टकरांचे" या चर्चासत्रात प्रा. कालगावकर, प्रा. चव्हाण, प्रा. अविनाश सप्रे (अध्यक्ष) सहभागी होतील. २८ जानेवारी पंडित आवळीकर काव्य पुरस्कारांचे वितरण होईल.

# करवीर रियासतीचा दुर्मीळ दस्तावेज उपलब्ध

## डी. टी. शिर्के : 'करवीर छत्रपती दुसरे शिवाजी' या पुस्तकाचे पुनर्प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** 'करवीर छत्रपती दुसरे शिवाजी' या पुस्तकाच्या पुनर्प्रकाशनामुळे करवीर रियासतीचा एक दुर्मीळ आणि ऐतिहासिक महत्त्वाचा दस्तावेज नव्या पिढीला वाचनासाठी उपलब्ध झाला आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी बुधवारी येथे केले.

येथील पार्श्व पब्लिकेशनच्या वतीने डॉ. कमलाकर श्रीखंडे लिखित 'करवीर छत्रपती दुसरे शिवाजी' या ऐतिहासिक ग्रंथाच्या पुनर्प्रकाशनावेळी ते बोलत होते. दुसरे शिवाजी यांना प्रदीर्घ कारकीर्द लाभली तरी, त्यांना शेजारील संस्थानांशी चौफेर संघर्ष करावे लागले. त्यातून त्यांना उसंत लाभली नाही. तरीही त्यांनी करवीर संस्थानाचे प्राणपणाने रक्षण केले. इतकी संघर्षशील कारकीर्द आजही दुर्लक्षित राहिली. ती यानिमित्ताने सामोरी येते आहे. या पुस्तकाचे इतिहासप्रेमी नागरिक स्वागत करतील, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.



कोल्हापुरात बुधवारी 'करवीर छत्रपती दुसरे शिवाजी' ग्रंथाचे पुनर्प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शेजारी डावीकडून राहुल भल्ले, आशिष कुलकर्णी, वैभवराज राजेभोसले, अवनिश पाटील, राहुल मेहता, पारस मेहता आदी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी दुसरे यांची कारकीर्द करवीर संस्थानाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असूनही दुर्लक्षित राहिली. डॉ. श्रीखंडे यांनी संशोधन करून त्यांच्या कारकिर्दीला उजाळा देण्याचे महत्त्वाचे काम केले. या ग्रंथाच्या पुनर्प्रकाशनामुळे त्यांचे कार्य नव्याने जनतेसमोर येते आहे, ही महत्त्वाची बाब असल्याचे विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी सांगितले.

यावेळी वैभवराज राजेभोसले यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास पार्श्व पब्लिकेशनचे राहुल मेहता, पारस मेहता, आशिष कुलकर्णी, राहुल भल्ले आदी उपस्थित होते.


गणेश वसईकर


दिनकर मनवर


सुप्रिया आवारे


नामदेव कोळी

# वसईकर, मनवर, कोळी आवारे यांना पुरस्कार

## विद्यापीठातर्फे २८ जानेवारीला वितरण

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : कवी गणेश आत्माराम वसईकर, दिनकर मनवर, सुप्रिया आवारे, नामदेव कोळी यांच्या काव्यसंग्रहांना शिवाजी विद्यापीठातर्फे पंडित आवळीकर काव्य पुरस्कार जाहीर झाला. रोख रक्कम, शाल, श्रीफळ, प्रशस्तिपत्र व विद्यापीठाचे स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

वितरण मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त २८ जानेवारीला ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस यांच्या हस्ते व कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. ही माहिती मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.



विद्यापीठाने मराठी भाषेत प्रसिद्ध होणाऱ्या सर्वोत्कृष्ट काव्यसंग्रहासाठी मराठी साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक, समीक्षक पंडित आवळीकर यांच्या नावे पंडित आवळीकर काव्य पुरस्कार देण्याचे निश्चित केले आहे. त्यानुसार आवळीकर यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या देणगीमधून पुरस्कार दोन वर्षांतून एकदा देण्यात येणार आहे. २०१४ ते २०२० या कालावधीतील एकूण चार काव्यसंग्रहांना एकाच वेळी हा पुरस्कार जाहीर झाला आहे. २०१४-१५ साठी गणेश आत्माराम वसईकर यांच्या 'मधल्या मध्ये' या काव्यसंग्रहास, २०१६-१७ साठी दिनकर मनवर यांच्या 'अजूनही बरंच काही', २०१८-१९ साठी सुप्रिया आवारे यांच्या 'न बांधल्या जाणाऱ्या घरात' आणि २०२० साठी नामदेव कोळी यांच्या 'काळोखाच्या कविता' या कविता संग्रहांना पुरस्कार जाहीर झाला. परीक्षक म्हणून प्राचार्य डॉ. गोविंद काजरेकर (बांदा), प्रा. नंदकुमार मोरे यांनी काम पाहिले.



गणेश वसईकर



दिनकर मनवर



सुप्रिया आवारे



नामदेव कोळी

# विद्यापीठाचा पंडीत आवळीकर काव्य पुरस्कार जाहीर

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

कवी गणेश वसईकर, दिनकर मनवर, सुप्रिया आवारे आणि नामदेव कोळी यांच्या काव्यसंग्रहांना शिवाजी विद्यापीठाचा 'पंडित आवळीकर काव्य पुरस्कार' जाहीर करण्यात आला. रोख रक्कम, शाल, श्रीफळ, प्रशस्तीपत्र आणि शिवाजी विद्यापीठाचे स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे. पुरस्कार वितरण सोहळा २८ जानेवारी रोजी ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आहेत, अशी माहिती मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

सन २०१४ ते २०२० या कालावधीतील एकूण चार काव्यसंग्रहांना एकाच वेळी हा पुरस्कार देण्यात येणार आहे. आवळीकर कुटुंबियांनी दिलेल्या देणगीमधून हा पुरस्कार दोन वर्षातून एकदा देण्यात येणार आहे. गणेश वसईकर यांच्या 'मधल्या मध्ये', दिनकर मनवर यांच्या 'अजूनही बरंच काही', सुप्रिया आवारे यांच्या 'न बांधल्या जाणाऱ्या घरात', नामदेव कोळी यांच्या 'काळोखाच्या कविता' या कविता संग्रहांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्कारासाठी परीक्षक म्हणून प्राचार्य डॉ. गोविंद काजरेकर, प्रा. नंदकुमार मोरे यांनी काम पाहिले.

# वैविध्यपूर्ण उपक्रमांत सातत्य राखावे

## डॉ. डी. टी. शिर्के : मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे उद्घाटन

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाने मराठी भाषा संवर्धनासाठीच्या वैविध्यपूर्ण उपक्रमांत सातत्य राखावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले. मराठी अधिविभाग व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ (मुंबई) यांच्या संयुक्त विद्यमाने साजऱ्या करण्यात येत असलेल्या भाषा संवर्धन पंधरवडाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, 'मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त 'स्मरण अरुण कोलटकरांचे' या चर्चासत्रांतर्गत अरुण कोलटकरांचे साहित्य, व्यक्तिमत्त्व यांची विविधांगांनी माहिती लोकांसमोर येईल.'' मराठी अधिविभागामध्ये स्थापित साहित्यिकांच्या कायमस्वरूपी चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. चित्रकार सुधीर गुरव यांचा सत्कार झाला. इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. अक्षय सरवदे, इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनिश पाटील, विदेशी भाषा प्रमुख डॉ. मेघा पानसरे, प्राचार्य डॉ. गोविंद काजरेकर, उदयसिंह राजेयादव उपस्थित होते. अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : मराठी अधिविभागासाठी साहित्यिकांची चित्रे रेखाटणारे चित्रकार सुधीर पवार यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.**